पश्चिम घाट विकास कार्यक्रमातंर्गत मंजूर असलेल्या पदांपैकी कक्ष अधिकाऱ्याचे पद व्यपगत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांकः निविआ ४०१५/प्र.क्र.३०८/१४२१

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

तारीख: २२ जानेवारी, २०१६

संदर्भ -

१) केन्द्र शासनाचे (नीति आयोग) पत्र क्रमांक : एम १३०५३/७/३/२०१४ एमएलपी, दिनांक २३ मार्च, २०१५

२) समक्रमांकाचे दिनांक २२ मे, २०१५ व दिनांक २० ऑगस्ट, २०१५ चे ज्ञापन

शासन निर्णय

पश्चिम घाट विकास कार्यक्रमांतर्गत या विभागामध्ये १३ मंजूर पदे आहेत. या पदांचा वेतन व भत्त्यावरील खर्च मागणी क्रमांक "ओ-५ २५५१ डोंगराळ क्षेत्र ०१ पश्चिम घाट पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (००२) डोंगराळ क्षेत्रांचा विकास (००) (१७) पश्चिम घाटांचा विकास केंद्राचा हिस्सा (२५५१ ०२५२) योजनांतर्गत योजना (दत्तमत) वेतन" या लेखाशीर्षाखाली केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात येत होता. मात्र, सन २०१५-१६ पासून पश्चिम घाट विकास कार्यक्रमांतर्गत निधी उपलब्ध होणार नसल्याचे केंद्र शासनाने संदर्भाधीन क्रमांक-१ येथील पत्रान्वये कळविल्याने या १३ पदांचा माहे एप्रिल, २०१५ ते डिसेंबर, २०१५ या कालावधीचा वेतन व भत्त्यावरील खर्च वित्त विभागाच्या सहमतीने मागणी क्रमांक " ओ-७ ३४५१ सचिवालय आर्थिक सेवा ०९० सचिवालय (०१) (०१) नियोजन विभाग योजनेतर (३४५१ ०१८२) दत्तमत वेतन" या लेखा शीर्षातून करण्यात आला.

तथापि, पश्चिम घाट विकास कार्यक्रमांतर्गत मंजूर असलेल्या पदांपैकी कक्ष अधिकारी हे पद व्यपगत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार नियोजन विभागाच्या मागणी क्रमांक "ओ-५ २५५१ डोंगराळ क्षेत्र ०१ पश्चिम घाट पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (००२) डोंगराळ क्षेत्रांचा विकास (००) (१७) पश्चिम घाटांचा विकास केंद्राचा हिस्सा (२५५१ ०२५२) योजनांतर्गत योजना (दत्तमत) वेतन" या लेखा शीर्षातून वेतन व भत्ते आहरित करण्यात येणारे कक्ष अधिकाऱ्याचे एक अस्थायी पद या निर्णयाद्वारे व्यपगत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२२१२५५१०९०१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anuradha Ravindra Patil

Digitally signed by Anuradha Ravindra Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=DEPUTY SECRETARY, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fea20e6e0ac5b86a2906ff97cc77420b17b511871758edb916644dbb0cc479c1, serialNumber=e7e1f96dff00df5a611f665a9a87611bd8b56d4a403d61fb9d7beabca923b428, cn=Anuradha Ravindra Patil
Date: 2016.01.22 12:56:04 +05'30'

अ.र.पाटील
उप सचिव, नियोजन विभाग

प्रत,

१) महालेखापाल (ले.व अ./ले.प.), महाराष्ट्र-१, मुंबई,
२) अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई
३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
४) अपर मुख्य सचिव (सेवा), यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
५) उप / अवर सचिव (कार्या.१४-ब) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
६) सर्व सह / उप / अवर सचिव, नियोजन विभाग
७) उप सचिव, व्यय-८ व वित्तीय सुधारणा, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८) कक्ष अधिकारी, कार्या. १४२२, १४२३ व १४२४उप सचिव, व्यय-४ व वित्तीय सुधारणा, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
९) अपर मुख्य सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक, नियोजन विभाग,
१०) नियोजन विभागातील सर्व कार्यासने
११) निवडनस्ती, कार्या.१४२१